दि.02 डिसेंबर, 2013

# राज्यसभेचे विरोधी पक्षनेते श्री अरुण जेटली यांची फेसबुक पोस्ट

जम्मू आणि काश्मीरमध्ये मुलीं विरोधी परिस्थितीः

भाजपचे पंतप्रधान पदाचे उमेदवार श्री नरेंद्र मोदी आणि श्री राजनाथ सिंह जम्मू आणि काश्मीर मध्ये विशाल रॅलीला संबोधन केले.

जम्मू आणि काश्मीर भारताचे अविभाज्य अंग आहे ही विचारधारा भारतीय जनसंघाच्या वेळेपासून भारतीय जनता पक्षाने अंगीकारली आहे.

भाजप मानतो की जम्मू आणि काश्मीर भारताचा अविभाज्य अंग असल्याचे डॉ.शामाप्रसाद मुखर्जी यांची विचारधाराच भारतासाठी योग्य आहे.

नेहरु विचारधारा 1953 सालानंतर जम्मू आणि काश्मीरला विशेष दर्जा देऊन स्वताची शासन आणि स्वातंत्र्या बद्दलची महत्त्वाकांक्षा वाढवली. या तीन विचारांनी जम्मू आणि काश्मीरला भारताच्या अन्य राज्यांबरोबर राजकीय तसेच संविधानाचे संबंध दुर्बल बनले. विशेष दर्जा देण्याच्या कारणामुळे वेगळ्या राज्याचा विचार केला गेला. कलम-370 प्रकरणी चर्चा करण्यासाठी भाजप कोणाबरोबर पण चर्चा करण्याचे आव्हान देतो.

मुलींविरोधी नीति

मागील पाच दशकापासून जम्मू आणि काश्मीरमध्ये वेगळा कायदा अंमलात आहे, ज्यात एक कायदा असा आहे की जम्मू आणि काश्मीरमध्ये कोणत्या परिवाराची मुलगी दुस-या राज्यातील युवकाशी लग्न केले तर ती जम्मू आणि काश्मीरमध्ये राहण्याचा अधिकार गमवते. त्या राज्याच्या अनेक महिलांनी या कायद्याला घटनेने मान्यता दिल्याबद्दल प्रश्न उठवित आहेत. जम्मू आणि काश्मीरच्या उच्च न्यायालयाने पण 7 ऑक्टोबर,2002 रोजी दिलेल्या निकालात असा उल्लेख केला होता की जम्मू आणि काश्मीर बाहेर लग्न करणारी मुलगी स्वताचा विशेषाधिकार गमावणार नाही. त्या केसमध्ये नॅशनल कॉन्फरन्स चे एडवोकेट जनरल एम.ए.गोनी यांनी मुलीच्या मागणी समोर विरोध केला होता. याची नोंद निर्णयात पण करण्यात आली होती. श्री उमर अब्दुल्ला यांच्या पक्षाच्या सरकारने ही विचारधारा दर्शावली होती. उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे नाराज नॅशनल कॉन्फरन्स सरकारने सर्वोच्च न्यायालयात स्पेशल लिव पिटीशन दाखल केली होती.

2003 साली कॉंग्रेसच्या पाठिंब्याने पीडीपी सरकार सत्तेत आली. ते सरकार जम्मू आणि काश्मीर रहिवाशी(दर्जा रद्द करणे) बील, 2004 सादर केले. ज्यामध्ये राज्याने बाहेरच्या परिवारात लग्न करणा-या मुलीला राज्यातील मिळकतीचा मालकी हक्क गमवावा लागणार अशी तरतूद करु उच्चन्यायालयाच्या निर्णयाला बिनापरिणामकारक बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्या बीलाला पीडीपी आणि नॅशनल कॉन्फरन्स सदस्यांनी समर्थन दिले होते. ते बील विधानसभेत सुद्धा मंजुर पण झाले होते.

मार्च 2004 मध्ये तत्कालिन पंतप्रधान श्री अटल बिहारी वाजपेयी यांनी असे सांगितले होते की, राज्य सरकारने या समस्येची उकेल काढायला पाहिजे. त्यावेळी पीडीपी आणि नॅशनल कॉन्फरन्स सदस्य घटनेचे कलम-370 खाली जम्मू आणि काश्मीरला देण्यात आलेला विशेष दर्जाचा मुद्दा पुढे धरण्यात आला.

विधानसभेत ते बील मंजुर झाले, पण नंतर विधानपरिषदेत अध्यक्ष त्याच्या बाजुने मतदान केले नाही त्यामुळे ते बील पुढे जाताना अडकले. नुकतेच ते बील पुन्हा एकदा पारित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. 2010 साली खाजगी बीलाप्रमाणे त्याला विधानपरिषदेत आणण्यात आले. घटनेचे कलम-370 खाली जम्मु आणि काश्मीरने दिलेल्या विशेष दर्जाचा मुद्दा आणि मुलींना विशेषाधिकाराचा मुद्दा आमनेसामने आला आहे.

उमर अब्दुल्ला स्वताच्या पक्षाच्या शंकास्पद कामगिरीकडे दुर्लक्ष करुन या प्रकरणाकडे विचार करणार का....अशी भेदभावपूर्ण गोष्टीचा स्वीकार केला नाही पाहिजे. भारतीय कायद्यात सर्वांना प्रतिष्ठेचे जीवन जगण्याचा अधिकार देण्यात आला आहे.